# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार
सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :– 645 / शि.वि. / सशिअ दिनांक – 03 / 07 / 2015

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
प्राथ / उच्च प्राथ / माध्यमिक शाळा
म.न.पा., नागपूर

विषय :— सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठयपुस्तके योजनेच्या अंतर्गत वर्ष २०१३—१४ व २०१४—१५ मध्ये शिल्लक असलेल्या पाठयपुस्तके व स्वाध्यायपुस्तिका बाबत.

संदर्भ :— महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे पत्र क्र. जा.क्र. मप्राशिप / सशिअ / मोपापु / काअ / २०१५—१६ / १६२७ दि. ३० / ०६ / २०१५.

उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये कळविण्यात येते की, सर्व शिक्षा अभियानातंर्गत मोफत पाठयपुस्तके योजनेची पाठयपुस्तके व स्वाध्यायपुस्तिका शाळास्तरावर, शहर साधन केंद्रस्तरावर शिल्लक असल्याबाबतचे पत्र मप्राशिप. मुंबई कडून प्राप्त झालेले आहे.

सदर योजनेची आपल्या शाळेत, शहर साधन केंद्रावर वर्ष २०१३—१४ व २०१४—१५ मध्ये शिल्लक असलेली पाठयपुस्तकांची खालील प्रपत्रातील रकान्यानूसार वर्ष निहाय स्वंतत्र माहिती भरून आपल्या **शहर साधन केंद्रावर दि. ८/७/२०१५ पर्यंत** जमा करावी.

| अ. क्र. | शैक्षणिक सत्र | माध्यम | इयत्ता | विषय | शिल्लक पाठय / स्वाध्याय पुस्तकांची संख्या | शिल्लक पाठय / स्वाध्याय पुस्तकांची रक्कम | पुस्तके शिल्लक राहण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१३—१४ | | | | | | |
| २ | २०१४—१५ | | | | | | |

शहर साधन केंद्र समन्वयकांनी उपरोक्त माहितीचे संकलन करून सकंलित केलेली माहिती दि. १० / ०७ / २०१५ रोजी सर्व शिक्षा अभियान कार्यालय, म.न.पा. नागपूर येथे श्री. प्रमोद गायकवाड समन्वयक यांना आणून दयावी.

शैक्षणिक सत्र २०१५—१६ करीता पाठयपुस्तकांची उचल करतेवेळी काही शाळेनी (दि. ३० सप्टेबर २०१४) च्या UDise पटसंख्येपेक्षा जास्त पाठयपुस्तके उचलल्याचे

निर्देशनास आलेले आहे आणि काही शाळांना शाळेच्या माध्यमाची पुस्तके न मिळता दुसऱ्या माध्यमाची पुस्तके मिळण्याची शक्यता आहे. मा. आयुक्त प्रत्येक शाळांना भेटी देणार असून मा. आयुक्त यांच्या भेटी दरम्यान उपरोक्त प्रकार आढळून आल्यास संबंधित शाळेचे मु.अ. यांना जबाबदारी राहील. करीता युडायस पटसंख्येपेक्षा जास्त असलेली किंवा दुसऱ्या माध्यमाची पाठयपुस्तके शाळेकडे असल्यास संबंधित शाळेने त्वरित आपल्या शहर साधन केंद्रावर पाठयपुस्तके परत करावी व त्याबाबत पोचपावती घेऊन शाळेत ठेवावी.

उपरोक्त कार्यवाहीस विलंब झाल्यास संबंधित शाळेचे मु.अ. आणि शहर साधन केंद्र समन्वयक जवाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी सविनय माहितीस्तव सादर.**

१. मा. राज्य प्रकल्प संचालाक, मप्राशिप. मुंबई
२. मा. आयुक्त, म.न.पा. नागपूर

**प्रत कार्यवाहीस्तव :**

३. शहर साधन केंद्र समन्वयक केंद्र क्र. .......... मनपा. नागपूर